# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पर्ल्स अग्रोटेक कॉर्पोरेशन कं. लिमिटेडच्या राज्यातील विविध जिल्ह्यातील मालमत्ता हस्तांतरणास प्रतिबंध करण्याबाबत**

**(१) ८४८३१ (०१-०९-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पर्ल्स अग्रोटेक कॉर्पोरेशन कं. लिमिटेडच्या स्थावर मालमत्ता विक्रीतून येणाऱ्या रक्कमेतून गुंतवणूकदारांची देणी परत देण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाने निवृत्त न्यायाधीश श्री.आर.एम.लोढा समितीची स्थापना केल्याने सदर कंपनी राज्यातील विविध जिल्ह्यातील मालमत्ता बोगस कंपन्या स्थापून त्यांच्या नावे हस्तांतरित करण्याचा प्रयत्न करीत असल्याची गंभीर बाब माहे जून २०१७ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्पन्न काय आहेत व तद्नुसार सदरहू कंपनीच्या राज्यातील विविध जिल्ह्यातील मालमत्ता हस्तांतरणास प्रतिबंध करण्याबाबत शासनाकडून अद्यापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१८) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई वगळून राज्यात पर्ल्स अग्रोटेक कॉर्पोरेशन कं. लिमिटेडच्या स्थावर मालमत्ता विकून येणाऱ्या रक्कमेतून गुंतवणुकदारांची देणी परत देण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाने निवृत्त न्यायाधीश श्री.आर.एम.लोढा समितीची स्थापना केल्याने सदर कंपनी राज्यातील विविध जिल्ह्यातील मालमत्ता बोगस कंपन्या स्थापून त्यांच्या नावे हस्तांतरित करण्याचा प्रयत्न करीत असल्याची बाब माहे जून २०१७ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली नाही.

सदरहू कंपनीच्या राज्यातील विविध जिल्ह्यातील मालमत्ता हस्तांतरण करण्याबाबत अद्याप कोठेही गुन्हा तक्रार दाखल नाही.

सदरहू कंपनीविरूध्द केंद्रिय अन्वेषण ब्युरो ( CBI ), नवी दिल्ली येथे गुन्हा दाखल आहे. याबाबत सी.बी.आय पुढील तपास करीत आहे. सदर कंपनीत गुंतवणुकदारांनी केलेल्या गुंतवणुकीची रक्कम त्यांना मालमत्ता विकून परत करण्याबाबतचे मा. सर्वोच्च न्यायालयाचे क्र.सिव्हील अपील क्र.११३०१/२०१५ दि.०२/०२/२०१६ च्या सुनावणीमध्ये आदेश झाले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील सर्व न्यायालये, आयोग व लवादांना पायाभूत सुविधा देण्याबाबत

**(२) ८८९०१ (०४-०९-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उच्च न्यायालयाने सर्व न्यायालये, आयोग व लवादांना आवश्यक सुविधा देण्याचे आदेश माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाला दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आदेशानुसार अद्यापपर्यंत राज्यातील न्यायालये, आयोग व लवादांना कोणकोणत्या सुविधा देण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, याबाबतची सदय:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.१५६/२०११ प्रकरणी दिनांक ५.५.२०१७ रोजी राज्यातील न्यायालये, आयोग, लवाद यांना पायाभूत सुविधा देण्याचे निर्देश दिले आहेत.
(२) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील न्यायालये पायाभूत सुविधा, मनुष्यबळ इत्यादी सुविधा देण्यात आल्या असून वाढीव सुविधा देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विविध विभागांच्या नियंत्रणाखाली असलेल्या आयोग, लवाद यांना पायाभूत सुविधा देण्यात आल्या असून त्यांनाही वाढीव सुविधा देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) वरीलप्रमाणे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भिवंडी (जि.ठाणे) येथे पतंजली या ब्रॅण्डचे मुदतबाहय झालेले गव्हाचे पीठ वापरून होत असलेली भेसळ

**(३) ९५१३२ (०६-०१-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) योगगुरु रामदेवबाबा यांच्या पतंजली या ब्रॅण्डचा  मुदत उलटून गेलेले तीस टन गव्हाचे पीठ सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील शिधापत्रिकेवर वितरित करण्यात येणाऱ्या गव्हाच्या पिठामध्ये भेसळ करुन ते बाजारात पुन्हा पतंजली या ब्रॅण्डखाली लक्ष्मीकुमार फुड ट्रेडिंग या फ्लोअर मिलकडून विकण्याचा प्रयत्न होत असताना दिनांक ६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास भिवंडी गुन्हे शाखेने धाड टाकून उक्त पीठाचा साठा जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास सदर फ्लोअर मिल ला  परवाना देताना या गोष्टीकडे हेतूपूरस्सर दुर्लक्ष केल्यामुळे  सदरहू भेसळ व्यवसाय उघडकीस येण्यास उशीर झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले  व त्यानुसार संबंधित दोषींवर  कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :**  (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी दि. ५.१०.२०१७ रोजी माणकोली, भिवंडी येथील अंजुरगाव या ठिकाणी मे.लक्ष्मीकुमार फुड या फ्लोअर मिल मध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील शिधापत्रिकेवर वितरित करण्यात येणा-या गव्हाच्या पिठामध्ये पतंजली आयुर्वेदिक कंपनीचे गव्हाचे पिठ ज्याची वैधता संपलेली आहे असे मिसळुन ते राजश्री गोल्ड व रॉयल अग्रो या ब्रॅण्डच्या पिशवीत पॅकींग केलेले व करीत असताना मिळुन आल्याने सदरचा साठा जप्त करुन संबंधितांविरुध्द नारपोली पोलीस स्टेशन गु.र.क्र. ४०४/२०१७, भा.दं.वि. कलम २७२, २७३, ४२०, ३४ सह जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ सह दि. बॉम्बे रेशनिंग एरिया शेड्युल्ड कमोडिटीज ऑर्डर १९८६ चे कलम ४, ५, ६, ७, ८ सह महाराष्ट्र फुड ग्रेन्स रेशनिंग रेग्युलेशन्स १९६६ चे कलम १८(३) ए ए ए प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मे. लक्ष्मीकुमार फुड ट्रेडिंग या पेढीचा अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गतचा परवाना रद्द करण्यात आलेला आहे. तसेच, नमुद गुन्ह्यातील ५ अटक आरोपींना मा. सत्र न्यायालयाने जामीन मंजुर केला असुन सदर गुन्हा तपासाधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी शहरात अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई होत नसल्याबाबत**

**(४)  ९५२५९ (०६-०१-२०१८).   श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी शहराच्या वेगवेगळ्या भागात गांजा या अंमली पदार्थाची मोठ्या प्रमाणात विक्री सुरू असल्याचे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी तीन संशयितांवर अटकेची कारवाई करण्यात आली असली तरी या अंमली पदार्थाची अनेक दिवसांपासून मोठ्या प्रमाणात विक्री सुरू असतांना पोलीस प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करीत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सखोल तपास करण्यात येऊन अंमली पदार्थांची विक्री करणा-यांवर व दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी तीन संशयीतांवर अटकेची कारवाई करण्यात आलेली आहे.

संपूर्ण जिल्हा स्तरावर दि.१६.०७.२०१४ ते दि.२८.०७.२०१४ या कालावधीत अंमली पदार्थ व अवैध दारु विरोधी जनजागरण मोहिम राबविण्यात आली होती तसेच लघुपट दाखवुन जनजागृती करण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे बीट अंमलदार यांचे कडून संबंधित कार्यक्षेत्रात गस्त करुन गोपनीय माहिती घेण्यात येते. जिल्ह्यामध्ये वेळेवेळी अचानक नाकाबंदी राबवून अंमली पदार्थांची वाहतूक/तस्करी होणार नाही याकरिता वाहन तपासणी करण्यात येते. पोलीस ठाणे स्तरावर शांतता बैठका, मोहल्ला बैठका आयोजित करुन अंमली पदार्थ विरोधी जनजागृती करण्यात येते, गोपनीय माहितीदारांमार्फत माहिती मिळताच संबंधितांवर कारवाई करुन गुन्ह्यास प्रतिबंध केला जातो.

(३) सदर प्रकरणी अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून आले नाही. तथापि रत्नागिरी शहर पोलीस ठाणे येथे १) गुन्हा रजि. नं. गु.र. नं.४४/२०१७, २) गुन्हा रजि. नं. ३९१/२०१७ ३) गुन्हा रजि. नं.५०४/२०१७ असे ३ गुन्हे दाखल आहेत.

(४) तात्काळ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

---

## राज्यातील वाढते सायबर गुन्ह्यांचे प्रमाण

**(५) ९५३६३ (०६-०१-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.सुरेश**

**(राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सायबर क्राईमच्या विविध गुन्हयांच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत असताना दाखल झालेल्या गुन्हयांतील निम्म्याहून अधिक गुन्हे सोडविण्यात पोलीसांना अपयश आले असून गत सहा वर्षांत राज्यभरात दाखल झालेल्या १० हजार ४१९ गुन्हयांमधील ७० टक्के गुन्हयांचा आजही शोध लागलेला नसून केवळ ०.३ टक्के गुन्हयांमध्येच आरोपींना शिक्षा झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत सर्वाधिक सायबर गुन्हयांची नोंद झाल्याची माहिती मिळत आहे तसेच पुणे शहरात सायबर गुन्हयांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून सन २०१७ मध्ये नऊ महिन्यात सायबर गुन्हयांत जवळपास दुपटीने वाढ झालेली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक शहरात ऑनलाईन फसवणुकीच्या गुन्हयांत सातत्याने वाढ होत असून या फसवणुकीमध्ये विनयभंग, पासवर्ड हॅक करुन एटीएम व्दारा पैसे काढून घेणे, बोगस कॉल सेंटरवरुन बँक खात्याची माहिती पासवर्ड संकलीत करण्याचे प्रकार ऑनलाईन फसवणुकीत होऊन सायबर गुन्हयात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कॅशलेस व्यवहारावर जोर देण्यासाठी शासनाने डिजिटल इंडिया व विविध योजना राबविल्या परंतु माहिती चोरुन नागरिकांच्या खात्यातून पैसे चोरी होत असल्याच्या घटना वाढत असल्याची माहिती माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(५) औरंगाबाद शहरासह मराठवाड्यात पूर्वपरिचित पण आता दुरावलेल्या महिलांचा सुड घेण्यासाठी त्यांचे आक्षेपार्ह फोटो, व्हिडीओ वेबसाईट किंवा सोशल मिडीयात वॉर व्हायरल करण्याच्या प्रमाणात चिंताजनक वाढ होत असून असे कृत्य करणारे बहुतेक जण उच्चशिक्षीत व तंत्रज्ञ आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यात वाढत्या सायबर गुन्हयांवर प्रतिबंध करण्यासाठी शासनाने कोणत्या प्रभावी उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) व (२) जानेवारी २०१२ पासून ऑक्टोबर २०१७ पर्यंत राज्यात माहिती व तंत्रज्ञान अधिनियमांतर्गत राज्यात १२०४७ गुन्हे नोंद झाले आहेत. त्यापैकी ३६०२ गुन्ह्यांची उकल झाली असून ८४४५ गुन्ह्यांची उकल झालेली नाही. राज्यातील सायबर गुन्ह्यांतील प्रकरणांचे दोष सिद्धीचे प्रमाण २४ टक्के इतके आहे.

मुंबई शहरात सन २०१७ मध्ये १५२२ सायबर गुन्हे दाखल झाले आहेत.

पुणे शहरात जानेवारी २०१६ ते सप्टेंबर २०१६ या कालावधीत ३१५ सायबर गुन्हे दाखल झाले होते. जानेवारी २०१७ ते सप्टेंबर २०१७ या कालावधीत २६० सायबर गुनहे नोंद झाले आहेत.

(३) हे म्हणने खरे नाही.

पोलीस आयुक्तालय, नाशिक शहर येथे दि.०१.०५.२०१७ रोजी सायबर पोलीस ठाणेची स्थापना झाल्यापासून एकुण ३५ गुन्हे दाखल झालेले असून त्यापैकी १२ गुन्हे उघडकीस आणून मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहेत. सदरचे गुन्हे अद्याप न्यायप्रविष्ट आहेत. सदर ०४ दाखल गुन्ह्यातील आरोपींना अद्याप जामीन झालेला नाही.

(४) इंटरनेट सहज उपलब्ध्द झाल्यामुळे इंटरनेट संसाधनांचा वापर वाढलेला आहे. स्मार्ट मोबाईल मुळे प्रत्येकाच्या हातात ऑनलाईन व्यवहार सहज झालेला आहे. सोशिअल नेटवर्किंग साईटमुळे प्रत्येकाचे ऑनलाईन संवाद संपर्क वाढले आहेत. कॅशलेस व्यवहारांमुळे बँकेचे ऑनलाईन व्यवहार करण्याचे प्रमाण वाढले आहे. प्रत्येक क्षेत्रात सायबर तंत्रज्ञान वापर वाढला असला तरी या तंत्रज्ञानापासून उद्भवणाऱ्या धोक्यांबद्दल लोकांमध्ये अज्ञान आहे. परिणामी सायबर तंत्रज्ञानात पारंगत असलेले गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी घडवून आणत आहेत.

(५) औरंगाबाद शहर पोलीस आयुक्तालयात महिला संबंधी आक्षेपार्ह फोटो, व्हिडीयो, वेबसाईट किंवा सोशल मिडीया बाबतची दखल गुन्ह्यांची आकडेवारी खालीलप्रमाणे असून सन २०१७ मध्ये सन २०१५ पेक्षा २ गुन्ह्यांची वाढ झालेली असून एकुण १७ गुन्हे नोंदविले गेले आहेत. असे कृत्य करणारे आरोपी सुशिक्षीत आहेत.

| वर्ष | २०१५ | २०१६ | २०१७ |
|---|---|---|---|
| संख्या | १५ | १५ | १७ |

(६) राज्यातील सर्व जिल्हे व पोलीस आयुक्तालयांमध्ये स्थापित एकुण ४७ सायबर लॅब/तंत्रज्ञानयुक्त गुन्हे अन्वेषण केंद्रांना सायबर पोलीस ठाणे असे घोषित करण्यात आले आहे. या ठिकाणी तपासाकरिता आवश्यक यंत्रसामुग्री (सॉप्टवेअर व हार्डवेअर) पुरविण्यात आले असून इतर सामुग्री पुरविण्यात येत आहे. सायबर गुन्ह्यांमध्ये अटक करण्यात आलेल्या आरोपींविरुध्द दोषारोप सिद्ध होण्यासाठी पोलीसांना नियमितपणे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

## राज्यभरातील दुरवस्था झालेल्या हुतात्मा स्मारकांच्या दुरुस्तीकरीता आलेला निधी परत गेल्याबाबत

**(६) ९६०५५ (३०-१२-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरातील दुरवस्था झालेल्या हुतात्मा स्मारकांची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने मंजूर केलेल्या निधीचा प्रशासकीय स्तरावरील दिरंगाईमुळे वापर न झाल्याने तो परत गेल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील हुतात्मा स्मारकांच्या दुरुस्ती करण्यासाठी रुपये २५ कोटींचा निधी दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यभरात २०६ हुतात्मे स्मारके असून त्याची वेळोवेळी दुरुस्ती न झाल्याने दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निधी खर्च न होण्याची नेमकी काय कारणे आहेत व राज्यातील हुतात्मे स्मारकांची दुरुस्ती होण्यासाठी शासन पुन्हा निधी मंजूर करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही. आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये राज्यातील २०६ हुतात्मा स्मारकांच्या डागडुजीसाठी शासन निर्णय दिनांक १४.२.२०१८ अन्वये एकूण रु.१७.५० कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे. १ एप्रिल २०१७ ते माहे ऑगस्ट २०१७ पर्यंत निधी वितरित केलेला नाही.

(२) होय.

(३) होय.

(४) सन २०१६-१७ मध्ये राज्यातील काही नगरपालिका/ग्रामपंचायतीच्या निवडणूका जाहीर झाल्यामुळे त्या क्षेत्रात आचारसंहिता लागू होती. सबब, आचारसंहिता लागू असल्यामुळे हुतात्मा स्मारकांच्या दुरुस्ती व परिरक्षणाची कामे हाती घेण्यासाठी निविदा प्रक्रिया, अन्य प्रशासकीय बाबी इत्यादी कामे क्षेत्रिय स्तरावर हाती घेण्यात आली नसल्यामुळे सदरचा निधी खर्च होऊ शकला नाही. सन २०१६-१७ या वर्षासाठी एकूण रु. २२,६९,०५,०००/- इतका निधी वितरित करण्यात आला होता व रु. ३,३२,३५,००५/- इतका निधी ३१ मार्च २०१७ पर्यंत अखर्चीत राहिलेला आहे. सन २०१७-१८ मध्ये एकूण रु. १७,५०,००,०००/- इतका निधी वितरित करण्यात आला असून एकूण रु.१३.४३ कोटी इतका निधी खर्च झाला असून रु.९.२५ कोटी बचत झालेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव शहरात नवीन उद्योगांना चालना देण्याबाबत

**(७) १०३७२१ (२६-१२-२०१७). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहरात बेरोजगाराचे प्रमाण वाढलेले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार जळगाव शहरातील बेरोजगारांना रोजगार मिळण्यासाठी नवीन उद्योगांना चालना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (११-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी रोजगार मेळावे, ग्रंथालय सदृश्य अभ्यासिका, बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करणे, रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम, व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र, प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान तसेच राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी व त्याद्वारे सुक्ष्म व लघु उद्योगांच्या निर्मितीसाठी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत सुधारित बीज भांडवल योजना, जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना व पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजना राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील मागासवर्गीयांच्या खोट्या जातीच्या प्रमाणापत्रांवर शासनाच्या सेवेतील आरक्षित नोकऱ्या बळकावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(८) १०४७६५ (०४-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीयांच्या खोट्या जातीच्या प्रमाणापत्रांवर शासनाच्या सेवेतील आरक्षित नोकऱ्या बळकावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचा निर्णय शासनाने माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खोट्या जातीच्या प्रमाणपत्रांवर शासनाच्या सेवेतील आरक्षित नोकऱ्या बळकावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१८) :** (१), (२) व (३) राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीयांच्या खोट्या जातीच्या प्रमाणापत्रांवर शासनाच्या सेवेतील आरक्षित नोकऱ्या बळकावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी दिले आहेत. त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या दृष्टीने राज्याचे महाअधिवक्ता यांचे मत घेतले असून त्यानुसार प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या समोर मान्यतेसाठी सादर केला आहे.

---

**कौशल्य विकास कार्यक्रमातंर्गत देण्यात आलेल्या रोजगारांबाबत**

**(९) १०४७८७ (०५-०४-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौशल्य विकास प्रशिक्षण संस्थेतील प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून संस्थास्तरावरील शिल्प निर्देशकांच्या रिक्त पदावर तासिका तत्वावर / कंत्राटी तत्वावर किती पर्यायी शिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे, कायमस्वरुपी शिष्य निर्देशकांची नियुक्ती करण्यासंदर्भात शासन कोणत्या उपाययोजना करीत आहे,

(२) तसेच किती खाजगी संस्था वा कंपन्यांना प्रशिक्षणाचे काम देण्यात आले, माहे जानेवारी, २०१५ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीत प्रतिवर्षी किती युवकांना प्रशिक्षण मिळाले, यातील किती जणांना रोजगार मिळाला, किती जणांनी स्वत:चा रोजगार तयार केला, याबाबत मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान पत्र पाठविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणतीही कार्यवाही न केल्याने प्रशिक्षणार्थींना योग्य प्रशिक्षण न मिळाल्याने लाखो तरुण रोजगारापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी केलेल्या चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कौशल्य विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२१-०५-२०१८) :** (१) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून संस्था स्तरावरील शिल्प निदेशकाच्या रिक्त पदांवर तासिका तत्वावर १०६५ व कंत्राटी तत्वावर ३०९ शिक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील पदांचा आढावा घेऊन आकृतीबंध मंजूर करण्याबाबतची कार्यवाही वित्त विभागाच्या सल्ल्याने सुरू आहे. आकृतीबंध मंजूर झाल्यानंतर रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

(२) कौशल्य विकास विभागातील रिक्त पदांमुळे व्यावसायिक प्रशिक्षणापासून विद्यार्थी वंचित राहत असल्याबाबत मा. विरोधी पक्ष नेता महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५.०१.२०१८ रोजी प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता यांना पत्र दिले हे खरे आहे.

(३), (४) व (५) प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून संस्थास्तरावरील शिल्प निदेशकांच्या रिक्त पदांवर तासिका तत्वावर / कंत्राटी तत्वावर पर्यायी शिक्षकांची नेमणूक करण्यात आली असून, विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सुरु आहे. कोणताही विद्यार्थी कौशल्य विकास प्रशिक्षणापासून वंचित राहिलेला नसल्यामुळे चौकशी करण्यात आलेली नाही.

---

**धर्मादाय रुग्णालयाकडून सर्वसाधारण व गरीब रुग्णांसाठी**
**आरोग्य सेवा पुरविले जात नसल्याबाबत**

**(१०) १०४८८४ (१८-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये धर्मादाय रूग्णालये ‘गरीबांच्या दारी’ या उपक्रमाचा दुसरा टप्पा दिनांक ३ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास राबविण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपक्रमांतर्गत राज्यातील ४५० धर्मादाय रूग्णालयांनी सहभाग घेतला होता तसेच या उपक्रमांतर्गत गरीब रूग्णांच्या घरी जाऊन त्यांच्यावर विनामुल्य उपचार करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहरातील रूबी हॉल रूग्णालय, जहांगीर रूग्णालय, इनलॅक्स बुधराणी रूग्णालय, पुणा रूग्णालय, संचेती रूग्णालय, मंगेशकर रूग्णालय, हार्डिकर रूग्णालय, सह्याद्री रूग्णालय , दिनानाथ मंगेशकर रूग्णालय, नेस वाडिया रूग्णालय, भारती रूग्णालय असे अनेक रूग्णालय, गरिबांसाठी राखीव असलेले १० टक्के राखीव खाटा योजनेतंर्गत निधी शिल्लक नाही हे कारण सांगून गरीब रूग्णांवर मोफत उपचार करत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्वसाधारण व गरीब रुग्णांना मोफत रुग्ण सेवा देण्यास टाळाटाळ करणा-या धर्मादाय रुग्णालयांवर कारवाई करण्याबाबत तसेच सर्वसाधारण व गरीब रुग्णांना मोफत रुग्ण सेवा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१८) :**(१) होय, सदर उपक्रमाचा पहिला टप्पा मुंबईत दि. ०४ नोव्हेंबर,२०१७ व दुसरा टप्पा उर्वरित राज्यात दि. ०३ डिसेंबर २०१७ रोजी राबविण्यात आला.

(२) सदर अभियानांतर्गत दोन्ही टप्प्यांत मिळून राज्यातील ३८४ धर्मादाय रुग्णालय तसेच धर्मादाय वैद्यकीय केंद्र व पुणे येथील तीन सामाजिक संस्थांनी सहभाग घेतला. तसेच, सदर उपक्रमांतर्गत झोपडपट्टी व गरीब वस्तीतील रुग्णांची विनामूल्य तपासणी करण्यात आली.

(३) नाही. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका (पीआयएल) क्र.३१३२/२००४ मधील आदेशानुसार मंजुर योजनेत नमूद केल्याप्रमाणे धर्मादाय रुग्णालयाने सर्व रुग्णांच्या देयकांच्या (निर्धन रुग्ण व दुर्बल घटकातील रुग्णांची देयके वगळून) दोन टक्के रक्कम प्रत्येक महिन्याला प्रत्यक्षात निर्धन रुग्ण निधी खात्यात जमा करावी व सदरची रक्कम ही जास्तीत जास्त निर्धन रुग्ण व दुर्बल घटकातील रुग्णांना वैद्यकीय उपचार देण्यासाठी खर्च करणे बंधनकारक आहे. त्यानुसार पुणे जिल्ह्यातील सर्व धर्मादाय रुग्णालये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका (पीआयएल) क्र.३१३२/२००४ मध्ये दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करीत आहेत. तसेच प्रश्नांकित सर्व रुग्णालये उपचार केलेल्या सर्व निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांची सर्व माहिती, नाव, पत्ता, उत्पन्नाचा पुरावा इत्यादी माहिती धर्मादाय कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावरही भरत आहेत. असे धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे शहरात ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर कोलशेत येथील नौदलाच्या तळावर संशयीत तरुणाने केलेली घुसखोरी**

**(११) १०५१५९ (१८-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र पोलीस बंदोबस्त असतानाही कोलशेत येथील नौदलाच्या तळावर संशयीत तरुणाने घुसखोरी केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कडेकोट बंदोबस्त असतानादेखील नौदलाच्या तळावर संबंधित तरुण का घुसला हे अद्यापही स्पष्ट झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणाची अधिकची सुरक्षा पुरविण्यासंदर्भात राज्य शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदरचा इसम हा नौदलाच्या तळालगत जे.टी.गेटजवळ, हायसिक्युरिटी भिंतीलगत नेव्हल स्टेशन कोलशेत रोड ठाणे येथे संशयास्पद स्थितीत मिळून आल्याने कर्तव्यावर असलेले गार्ड यांनी त्यास त्यांच्या वरिष्ठाच्या निदर्शनास आणून देवून त्यास पुढील कारवाई करिता पोलीसांच्या ताब्यात दिल्याने त्याचेवर गुन्हा दाखल केला आहे.
आरोपी याची पत्नी त्याला सोडुन गेली असल्याने तीच्या शोधात तो ठाणे येथे आलेला होता. व त्याला रस्ता माहिती नसल्याने सदर नौदलाच्या तळालगत जे.टी. गेटजवळ, हायसिक्युरिटी भिंतीलगत नेव्हल स्टेशन कोलशेत रोड ठाणे येथे पोहचला असे प्रथमदर्शनी चौकशीत समोर आले आहे.
(३) विभागातील पोलीस ठाण्याचे हद्दीतील गोपनीय यंत्रणा सतर्क करुन हद्दीत स्थानिक पोलीसांची गस्त वाढविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गेटवे ऑफ इंडिया ते एलिफंटा व गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा-अलिबाग हा सागरी प्रवास महागल्याबाबत**

**(१२) १०५२६८ (१७-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेटवे ऑफ इंडिया ते एलिफंटा व गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा-अलिबाग हा सागरी प्रवास माहे जानेवारी, २०१८ पासून १० ते २० रुपयांनी महागला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे दररोज प्रवास करणा-या नागरिकांवर आर्थिक बोजा वाढला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची दरवाढ करण्याची कारणे काय आहेत व ही दरवाढ कमी करण्याबाबत शासनाची भुमीका काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०६-२०१८) :** (१) व २) होय, हे खरे आहे.
गेटवे ऑफ इंडिया ते एलिफंटा व गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा या जलमार्गादरम्यानचे प्रवासी तिकीट दरनिश्चिती/तिकीट दरामध्ये होणारी वाढ मुंबई बंदर विश्वस्थ (MBPT) विभागामार्फत केली जाते. मुंबई बंदर विश्वस्थ (MBPT) हे केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**"स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर" यांना केंद्र सरकारने "भारतरत्न किताब" या पुरस्काराने, सन्मानित करण्याबाबत**

**(१३) १०५३५६ (१८-०४-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **राज्यशिष्टाचार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रखर राष्ट्रभक्त "स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर" यांना मरणोत्तर "भारतरत्न किताब" या पुरस्काराने, सन्मानित करण्यासंदर्भात लोकप्रतिनीधींनी मा.मुख्यमंत्री यांना माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने, सदरहू पत्राच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन स्वातंत्र्यवीर सावरकरांना, "भारतरत्न किताब" पुरस्कार मिळण्याबाबत अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२१-०५-२०१८) :** (१) व (२) नाही.

माहे जानेवारी, २०१७ मध्ये मा.मुख्यमंत्री कार्यालयाकडून स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांना भारतरत्न या पुरस्काराने सन्मानित करण्याबाबतचे श्री.रघुनाथ मुकणे, संस्थापक सदस्य, चर्मकार महामंच ठाणे यांचे निवेदन विभागास प्राप्त झाले आहे. याशिवाय अन्य काही संस्थांनी देखील अशाच प्रकारची मागणी शासनाकडे केलेली आहे.

भारतरत्न पुरस्कारासंदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये "The recommendation for Bharat Ratna are made by the Prime Minister himself to the President. No formal recommendations for this are necessary." असे नमूद केलेले आहे. त्याआधारे निवेदनकर्त्यांना शासन स्तरावरुन ही वस्तुस्थिती अवगत करण्यात आलेली आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईस्थित देवनार पोलीस चौकीत कार्यरत असणाऱ्या हवालदाराचा बंदोबस्त दरम्यान मृत्यू झाल्याबाबत**

**(१४) १०५३७६ (१२-०४-२०१८). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईस्थित देवनार पोलीस चौकीत कार्यरत असणाऱ्या रघुनाथ सहाणे या हवालदाराचा बंदोबस्त दरम्यान मृत्यू झाल्याची बाब दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस प्रशासनामध्ये अति कामाच्या तणावामुळे पोलीस कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या प्रकृतीवर परिणाम होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस कर्मचारी/अधिकाऱ्यांवरील ताण कमी होण्यासाठी शासनातर्फे कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१८) :** (१) व (२) पोलीस हवालदार रघुनाथ सहाणे यांना दि. ०२.०१.२०१८ रोजी गोवंडी पोलीस ठाणे हद्दीतील पांजरपोळ या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या सुशोभिकरणाचे उद्घाटन बंदोबस्ताकरिता नेमण्यात आले होते. सदरचा बंदोबस्त संपवुन ते रात्री २१:०० वा. च्या सुमारास त्यांच्या राहते घरी गेले होते. रात्रीच्या जेवणानंतर त्यांना अस्वस्थ वाटून ते बेशुध्द पडल्याने त्यांना शताब्दी रुग्णालय येथील प्राथमिक उपचारानंतर सायन रुग्णालय येथे उपचारादरम्यान दि. ०८.०१.२०१८ रोजी ०५:३० वा त्यांचे निधन झाले आहे.

त्यांचेवर उपचार करणा-या वैद्यकीय अधिका-यांनी मृत्युचे कारण Raised Intracranial tension, Intracanial Bleed- Natural असे दिले आहे. त्याबाबत पो.ह. सहाणे यांच्या पत्नीचा व मुलाचा जबाब नोंद करण्यात आला असुन त्यांनी संशय अगर तक्रार नसल्याचे नमुद केले आहे.
(३) पोलीस कर्मचा-यांवरील कामकाजाचा ताण कमी व्हावा यासाठी दि. ०५.०५.२०१६ पासुन परिमंडळ-६ मधील देवनार पोलीस ठाणे येथे प्रायोगिक तत्त्वावर ८ तास कर्तव्य सुरु करण्यात आले आहे. सध्या परिमंडळातील सर्व पोलीस ठाण्यास ८ तास कर्तव्य सुरु करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंदभट्टी (ता.अहेरी, जि.गडचिरोली) गावातील एका व्यक्तीची पोलीसांचा खबरी असल्याच्या संशयावरुन नक्षलवाद्यांनी हत्या केल्याबाबत**

**(१५) १०५५२३ (१२-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंदभट्टी (ता.अहेरी, जि.गडचिरोली) गावातील मधुकर आत्राम यांची पोलीसांचा खबरी असल्याच्या संशयावरुन नक्षलवाद्यांनी गोळ्या झाडून हत्या केल्याची घटना दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार शासनाने पुढे कोणती कारवाई केली व मृताच्या नातेवाईकाला शासनाने कोणती मदत देली वा देण्यात येत आहे तसेच अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नये याबाबत कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०५-२०१८) :** (१) व (२) होय.
(३) सदर घटनेच्या अनुषंगाने उपपोस्टे पेरीमिली येथे अप क्र. ०८/२०१७, कलम ३०२, ३२३, १४३, १४७, १४८, १४९, १२० (ब) भांदवि, सहकलम ५/१७ भाहका, अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नक्षलवाद्यांची माहिती पोलीसांना देतो असा संशय घेवून दहशत पसरविण्याचे उद्देशाने नक्षलवाद्यांनी त्याचा खुन केल्याचे चौकशीत आढळून आले आहे.

मृतकाचे वारसदारांना एस.आर.ई. अंतर्गत २ लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाकडून रुपये ३ लक्ष व केंद्र शासनाकडून ५ लक्ष ऐवढी मदत प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरातील स्मार्ट पोलीसिंग करण्यासाठी पुणे पोलीसांनी सुरु केलेले संकेतस्थळच अद्ययावत नसल्याबाबत

**(१६) १०५८१९ (०७-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील स्मार्ट पोलीसिंग करण्यासाठी पुणे पोलीसांनी सुरु केलेले संकेतस्थळच अद्ययावत नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,पोलीसांच्या या संकेतस्थळावर दिलेल्या माहितीचा वापर पुणेकर शहरात रोज करत असून टेक्नो सेव्ही पुणेकरांना दिलेले पोलीस ठाण्याचे दूरध्वनी क्रमांक तसेच पोलीस ठाण्याच्या बदलेल्या पोलीस अधिकाऱ्यांची नावेही अद्ययावत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू बाबींमुळे नागरिक त्रस्त झालेले असून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणत्या उपयायोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१८) :** (१) व (२) पुणे शहर पोलीस दलासाठी www.punepolice.gov.in व www.punepolice.co.in अशी दोन संकेतस्थळे अद्ययावत करून कार्यन्वित करण्यात आली आहेत. सदर संकेतस्थळावर पुणे शहर पोलीस दलाची संपुर्ण माहिती अदयावत आहे. तसेच सदर संकेतस्थळावर पुणे शहर पोलीस दलाचे व्टिटर हँडल, फेसबुक पेज यांची देखील लिंक देण्यात आलेली आहे.
(३) सद्यस्थितीत, पुणे पोलीस दलाचे दोन्ही संकेतस्थळे अदयावत असून कार्यान्वितही आहेत.

याशिवाय महाराष्ट्र पोलीसांकडून www.mhpolice.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ सुरू केले असून त्यामधील सिटीझन पोर्टल च्या माध्यमातुन नागरीकांकरीता, ऑनलाईन कम्प्लेंट, हरवलेल्या व्यक्तींचा शोध, अनोळखी मृतदेह, नवरात्र उत्सव परवाना, गणेशोत्सव परवाना, अटक आरोपींची माहिती, एफ. आय. आर. इतर गुन्हेगारांची माहिती व इतर अनेक

सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत व याबाबत सर्व पोलीस स्टेशनला फ्लेक्स लावून व वर्तमानपत्रातून प्रसिद्धी देण्यात आल्या आहेत. तसेच पोलीस आयुक्त कार्यालयाचे प्रवेशद्वारावर किऑस्क सेंटर उभारून नागरीकांना वेळोवेळी माहिती दिली जात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील सत्र न्यायालय इमारतीच्या तीस-या मजल्यावर लागलेली आग

**(१७) १०६१४६ (१८-०४-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत आगीचे सत्र सुरु असतांनाच दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास सत्र न्यायालय इमारतीच्या तीस-या मजल्यावर आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आगीत न्यायालयाची महत्वाची कागदपत्रे व फर्नीचर जळून राख झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

सदर आग ही तिसऱ्या मजल्यावरील कोर्ट रुम नं.३४ च्या आग्नेय कोपऱ्यातील छताला लागली होती.

या आगीमध्ये कोणतीही कागदपत्रे व फर्निचर साहित्य जळालेले नाही.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी न्यायाधीश श्री. डि.पी. सुराणा यांच्याकडे कार्यालयीन चौकशीचे प्रकरण सुरु आहे.

---

### मुंबई मध्ये ओएनजीसीचे पवन हंस हेलिकॉप्टर कोसळून दोन वैमानिकसह पाच जणांना मृत्यू झाल्याबाबत

**(१८) १०६१७२ (१४-०४-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मध्ये ओएनजीसीच्या पाच वरिष्ठ अधिका-यांना अरबी समुद्रातील तेलविहिरीकडे घेऊन जाणारे पवन हंस हेलिकॉप्टर कोसळून दोन वैमानिकांसह पाच जणांचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी झालेल्या मृत्युबाबत सांताक्रुझ पोलीस स्टेशन यांनी नोंद केलेले परंतु पुढील तपासकामी यलोगेट पोलीस स्टेशन येथे प्राप्त झालेले अपमृत्यु नोंद क्र. ०३, ०४, ०५, ०६, ०७, ०८, ०९, १०/१८, फौ.दं.प्र.संहिता कलम १७४ अन्वये तसेच यलोगेट पोलीस स्टेशन यांनी अपमृत्यु नोंद क्र. ०२/१८, फौ.दं.प्र.संहिता कलम १७४ अन्वये नोंद केलेला आहे.

उपरोक्त नमुद सर्व मृतदेहांचे व्हिसेरा व डीएनए परिक्षणाकरिता प्रयोगशाळा, कलिना, सांताक्रुझ तसेच जे.जे. रुग्णालय येथे जमा करण्यात आले आहेत. सदर घटनेची संपुर्ण चौकशी "मिनिस्ट्री ऑफ सिव्हील नेव्हीगेशन मार्फतीने एअरक्राफ्ट अक्सीडेंट इन्व्हेस्टीगेशन ब्युरो" यांचेमार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील जिल्हा न्यायालयातील अग्नीशामक यंत्र मुदतबाह्य झाल्याबाबत**

**(१९) १०६२२१ (०६-०४-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील जिल्हा न्यायालयातील अग्नीशामक यंत्र मुदतबाह्य झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा न्याय ग्राहक परिषदेने सदर बाब शासनाच्या निदर्शनास आणुन दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीन यंत्रणा बसविण्यासाठी आर्थिक कमतरता कारणीभुत असल्याचे मनपा अग्नीशमक विभागाचे प्रमुख यांनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०५-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
जिल्हा न्यायालय नागपूर येथे सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूर यांच्याकडून दिनांक १४.०८.२०१६ रोजी अग्नीशमन यंत्र बसविण्यात आलेले होते व त्यावर त्यांची कालबाह्य मुदत दिनांक १४.०८.२०१७ पर्यंत लिहीलेली होती. अग्नीशमनयंत्राची मुदत संपण्यापूर्वी जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागास ते बदलवून दुसरे नवीन अग्नीशमन यंत्र बसवून देण्याचे किंवा त्यांची पुनर्भरणी करण्याचे मौखिक आदेश दिले होते. जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर येथे बसविण्यात आलेली अग्नीशम यंत्रे अद्ययावत तंत्रज्ञानाने

बनविलेली असून त्यांचा वापर जोपर्यंत करण्यात येत नाही तोपर्यंत ती कालबाह्य ठरणार नाहीत, चुकीने या यंत्रावर एक वर्षाचा वॉरंटी कालावधी टाकण्याऐवजी मुदतबाह्य तारीख टाकण्यात आली असून ती चूक आता कंपनीतर्फे दुरुस्त करण्यात आल्याचा खुलासा अग्निशमन यंत्रे बसविणारी कंपनी व्ही.के.एंटरप्रायझेस, नागपूर यांनी केला आहे.
जिल्हा न्याय ग्राहक परिषदेचे निवेदन विधि व न्याय विभागास प्राप्त झालेले नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### ठाणे महानगरपालिका हद्दीतील मासुंदा तलावात एका घोड्याचा पाण्यात व गाळात बुडून मृत्यू झाल्याबाबत

**(२०) १०६३०१ (१९-०४-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील मासुंदा तलावात एका १६ वर्षीय घोड्याचा पाण्यात व गाळात बुडून मृत्यू झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले व तद्नुसार मासुंदा तलावाच्या ठेकेदार व प्रदूषण विभागाच्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) स्थानिक पोलीस स्टेशनच्या अहवालानुसार आंघोळ घालून बाहेर काढतांना गळ्यातील दोर पायात गुंतून घोडा पाण्यात पडल्याने, नाका तोंडात पाणी शिरुन घोड्याचा मृत्यू झालेला आहे.
(२) मासुंदा तलाव ठेकेदारास तलाव निगा व देखभालीच्या कामामध्ये हलगर्जीपणा केल्यामुळे नोटीस बजावण्यात आली असून दंडात्मक कारवाई करण्यात येत असल्याचे ठाणे महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्य शासनाच्या विविध विभागात गट क आणि गट ड वर्गात मोठ्या प्रमाणात जागा रिक्त असतूनही राज्य शासन त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याबाबत

**(२१) १०६४५१ (११-०४-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या विविध विभागात गट क आणि गट ड वर्गात मोठ्या प्रमाणात जागा रिक्त असूनही राज्य शासन ते भरण्यास दुर्लक्ष करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाची नोकरभरतीच निघत नसल्याने सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जागा रिक्त असण्याची कारणे काय आहेत रिक्त जागा भरण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :** (१) राज्य शासनाच्या विविध विभागात गट क आणि गट ड वर्गात मोठ्या प्रमाणात जागा रिक्त असूनही राज्य शासन त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याबाबत कोणत्याही संघटनेचे अथवा मा.लोकप्रतिनिधीचे निवदेन/पत्र माहे माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(२), (३) व (४) दिर्घकालीन वित्तीय स्थैर्यासाठी वेतनवाढीचा सरासरी दर हा महसूल वाढीच्या सरासरी दरापेक्षा अधिक असता कामा नये, हे सर्वसाधारण तत्व पाळणे आवश्यक आहे. तसेच, केंद्र शासनाच्या धर्तीवर सातव्या वेतन आयोगानुसार वेतन सुधारणा करण्याचा निर्णय झाल्यास वेतनावरील खर्चात संभाव्य वाढ विचारात घेऊन नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती यावर नियंत्रण आणण्याचा निर्णय वित्त विभागाच्या दि.०२/०६/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये पदभरतीवर काही प्रमाणात निर्बंध घालण्यात आले आहेत.

याखेरीज वित्त विभाग शासन निर्णय दि.२५/०५/२०१७ नुसार जे प्रशासकीय विभाग सेवार्थ/ शालार्थ प्रणालीतील मंजूर पदसंख्येत असलेली तफावत व इतर त्रुटी दूर करुन, आकृतिबंध नव्याने अंतिम करुन घेतील, त्याच विभागांना वित्त विभागाच्या दि.०२/०६/२०१५ च्या शासन निर्णयानुसार तसेच, तद्नंतरच्या दि.२३/०९/२०१५, दि.१७/११/२०१५ आणि दि.१५/०१/२०१६ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या सूचनांनुसार पदभरतीस मुभा देण्यात आलेली आहे व जे प्रशासकीय विभाग आकृतिबंध अंतिम मंजूर करुन घेणार नाहीत, त्या विभागांना नवीन पदनिर्मिती तसेच, पदभरती करता येणार नाही. तसेच, तोपर्यंत पदे रुपांतरित करता येणार नाही, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

असे जरी असले तरी पदोन्नतीच्या वाट्याची पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून आकृतिबंध अंतिम मंजूर करुन घेणाऱ्या विभागांना पदे भरण्याची मुभा आहे. याशिवाय विधिमंडळात आश्वासित केल्यानुसार विविध विभागातील सरळसेवेची एकूण ३६,००० पदे भरण्यास मान्यता देण्याची आवश्यक कार्यवाही वित्त विभागाकडून करण्यात येत आहे.

---

**साखरखेर्डा (जि.बुलढाणा) येथील एका शेतक-याचे बोअरिंगचे काम पूर्ण न करता केलेली फसवणुक**

**(२२) १०६७३० (१२-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरखेर्डा (जि.बुलढाणा) येथील एका शेतक-याच्या विहिरीत आडवे बोअर घेतले असता बोअरिंगचे पूर्ण काम न करता जास्त पैसे घेऊन शेतक-यांची फसवणूक केल्या प्रकरणी साखरखेर्डा पोलीस ठाण्यात दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार फसवणूक करणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) फसवणूकीच्या तक्रारीस अनुसरुन सहाय्यक पोलीस उप निरिक्षक, पो. स्टे., साखरखेर्डा यांनी चौकशी केली आहे.

आडवे बोअरचे मोजमाप आवश्यक असल्याने भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, बुलढाणा यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. त्यांचेकडून मोजमाप प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष फसवणूक झाल्याचे सिध्द झाल्यास गैरअर्जदाराविरुध्द गुन्हा दाखल करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळमनुरी (ता.जि.हिंगोली) येथील खरवड भैरवनाथ मंदिरातील महाराज यांना आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल केल्याबाबत**

**(२३) १०६८३८ (११-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (ता. जि.हिंगोली) येथील खरवड भैरवनाथ मंदिरातील महाराज मुरलीधर रामा राऊलवार यांना धक्काबुकी केल्याने अपमान सहन न होऊन त्यांनी स्वत:च्या अंगावर रॉकेल टाकून घेतले असल्याने त्यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी रेशन दुकानदाराविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित दोषी रेशन दुकानदार प्रभाकर गिरी यांची चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१८) :** (१) होय. सदरची घटना दिनांक २७.१२.२०१७ रोजी घडलेली आहे.

(२) सदर घटनेच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन बासंबा येथे आकस्मात मृत्यू २२/२०१७ कलम १७४ सिआरपिसी प्रमाणे दाखल केली आहे. रेशन दुकानदाराने मारहाण व धक्काबुक्की केल्याने हा अपमान सहन न झाल्यामुळे महाराजांनी आत्महत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने पो.स्टे.बासंबा गु.र.नं.२०४/२०१७ कलम ३०६,३२३, ५०४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासा दरम्यान आरोपीला मा.न्यायालयाने अटकपुर्व जामीन मंजूर केल्याने आरोपीला दिनांक २३.०१.२०१८ रोजी नॉमीनल अटक केली. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संगमनेर शहर (जि.अहमदनगर) शहरांत दीड हजार किलो गोमांसासह चार जिवंत वासरे पकडल्याबाबत

**(२४) १०६८५३ (११-०४-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर शहर (जि.अहमदनगर) शहरांत पोलीसांनी केलेल्या दोन कारवाईत दीड हजार किलो गोमांसासह रुपये वीस हजार किंमतीचे चार जिवंत वासरांची मुक्तता केल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणांतील दोषींना पोलीसांनी अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर घटनेबाबत संगमनेर शहर पोलीस स्टेशन गु.र.क्र.१९२/२०१७ भा.दं.वि. कलम २६९, ४२९, ३४ महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा, १९९५ चे कलम ५(क) ५(अ) १,९,९ (अ) व आर्म ॲक्ट ४/२५ प्रमाणे. तसेच संगमनेर शहर पोलीस स्टेशन गु.र.क्र. १९३/२०१७ भादंवि कलम २६९, ४२९, ३४, महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा. १९९५ चे कलम ५(क) ९(अ) प्रमाणे गुन्हे दाखल करुन चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुकंपा तत्वावर देण्यात येत असलेल्या नोकरीबाबत

**(२५) १०७०३१ (१८-०४-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय सेवेत असलेल्या व्यक्तीचे कर्तव्यावर असताना निधन झाल्यास त्याबदल्यात त्याचा पती किंवा पत्नीला अनुकंपा तत्वावर शासनाकडून नोकरी दिली जात असून सदरची नोकरी ही मिळेपर्यंत अनेक वर्ष निघून जातात व लाभार्थी व्यक्तीचे वयोमर्यादा देखील संपत येते अशा वेळेस त्या लाभार्थी व्यक्तीला त्याच्या ऐवजी त्याच्याच कुटूंबातील दुसऱ्या व्यक्तीचे नाव सुचविण्याचे अधिकार देण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून होत असल्याची बाब माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुकंपा तत्वावरील नोकरी ही प्रतिक्षा यादीप्रमाणे न देता ज्या व्यक्तीचे निधन होते त्याच वेळी त्याच्या रिक्त जागी देणेबाबत शासनस्तरावर कोणती सुधारणा होत आहे,

(३) तसेच, त्याच्याच कुटूंबातील दुसऱ्या व्यक्तीचे नाव सुचविण्याचे अधिकार देण्याच्या मागणीबाबत शासनाची भुमीका काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीवरील नाव बदलण्याची तरतुद अनुकंपा नियुक्ती धोरणात नाही. तथापि शासन निर्णय, सा.प्र.वि., दि.२०.०५.२०१५ नुसार अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीवरील उमेदवाराचे निधन झाल्यास त्या ठिकाणी अन्य पात्र वारसदाराचे नाव घेण्यात येते. अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीवरील उमेदवाराचे नाव वयाधिक्यामुळे वगळल्यानंतर त्या ठिकाणी त्याच्याऐवजी त्याच्याच कुटुंबातील दुस-या व्यक्तीचे नाव सुचविण्याचे अधिकार देण्याच्या मागणीबाबतचे लोकप्रतिनिधीकडून माहे जानेवारी २०१८ वा त्या दरम्यान कोणतेही निवेदन प्राप्त झालेले दिसून येत नाही. तथापि सदर मागणीबाबत यापूर्वी विविध लोकप्रतिनिधी, अनुकंपा संघटना, अनुकंपाधारक इ. यांची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(२), (३) व (४) शासन निर्णय, सा.प्र.वि., दि. २२.०८.२००५ नुसार अनुकंपा नियुक्तीसाठी दुहेरी प्रतीक्षासूची पध्दत अवलंबली जाते.

शासन निर्णय सा.प्र.वि., क्र. अकंपा-१२१५/प्र.क्र.१२७/आठ, दि.२०.०६.२०१५ अन्वये मा.मंत्री, वित्त यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील राज्य शासकीय/निमशासकीय/महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी अनुकंपा धोरण सुधारणे आणि त्याचबरोबर प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोक-यांमध्ये भरती करण्यासंबंधी आढावा घेणे व त्या अनुषंगाने प्रभावी उपाययोजना सूचविण्यासाठी मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली असून मंत्रीमंडळ उपसमितीच्या अद्यापपर्यंत ५ बैठका झालेल्या आहेत.

अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीवरील उमेदवाराचे नाव बदलण्याबाबत तसेच विनाअट अनुकंपा नियुक्ती देण्याबाबतच्या मागण्याबाबतची निवेदने मंत्रीमंडळ उपसमितीसमोर विचारार्थ ठेवण्यात आली आहेत.

---

## ठाणे पोलीसांनी इंदोर येथून एफेड्रिन (एमडी पावडर) अंमली पदार्थाची विक्री करणा-यांना अटक केल्याबाबत

**(२६) १०८०६० (१२-०४-२०१८). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे पोलीसांनी इंदोर येथून एफेड्रिन (एमडी पावडर) अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांना दिनांक ७ जोनवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास अटक करुन त्यांच्याकडून ८२२ ग्रॅम एमडी पावडर जप्त केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.

दि. ०३.०१.२०१८ रोजी ठाणे गुन्हा शाखा वागळे युनिट-५ ने सापळा लावुन आरोपीत अक्रम असलम खान याचे कडुन रु.१६,४४,०००/- किंमतीचे ८२२ ग्रॅम वजनाचे मेफेड्रॉन (एम डी) पावडर अंमली पदार्थ, जप्त करुन त्यास अटक करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणी दि.०६.०१.२०११ रोजी आरोपीत क्र.२ रईसउद्दिन सल्लाउद्दीन शेख व अजय सुरजसिंग जादौन यांना अटक करण्यात आली आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असुन वागळे ईस्टेट पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. ०३/२०१८ एन डी पी एस अॅक्ट कलम ८(क), २२, २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास चालु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात गत वर्षभरात जेष्ठ नागरीकांबाबतच्या गुन्ह्यात लक्षणीय वाढ झाल्याबाबत

**(२७) १०८५२७ (०५-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या गृह खात्याने जाहिर केलेल्या ‘क्राईम इन’ २०१६ या अहवालानुसार राज्यात गत वर्षभरात जेष्ठ नागरीकांबाबतच्या गुन्ह्यात लक्षणीय वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जेष्ठ नागरीकांच्या सुरक्षततेसाठी शासनाने कोणती यंत्रणा उभारली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :** (१) सन २०१६ मध्ये ज्येष्ठ नागरिकांबाबत एकूण ४६९४ गुन्हे दाखल झाले आहेत.
(२) ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत पोलीस महासंचालक यांचे स्तरावरुन दि.२८/१/२०१३ व दि.१६/१०/२०१५ च्या परिपत्रकान्वये ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेबाबत काळजी घेण्याबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करमाळा (ता.करमाळा, जि.सोलापूर) दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या आवारात बार असोसिएशनसाठी प्रतिक्षालय बांधण्याबाबत**

**(२८) १०९००८ (०६-०४-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (ता.करमाळा, जि.सोलापूर) दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या आवारात बार असोसिएशनसाठी प्रतिक्षालय बांधण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व राज्यमंत्री, विधी व न्याय यांचेकडे दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनातील मागणीबाबत शासनाने काय निर्णय घेतला व त्यानुषंगाने शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २३५ नुसार दुय्यम न्यायालयांचे सर्व नियंत्रण मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे आहे. यास्तव, सदर निवेदन योग्य त्या कार्यवाहीकरीता शासन पत्र दि. २७.६.२०१७ अन्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना पाठविण्यात आले होते. त्यानुसार सदर प्रकरणी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर यांनी कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.अकलुज यांच्याकडून अंदाजपत्रके मागविली असल्याचे व ती प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाईसाठी शासनाकडे अग्रेषित करण्यात येतील असे, मा.उच्च न्यायालयाने दि.११.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या समांतर आरक्षणासाठी काढलेल्या परिपत्रकाची होणारी चुकीची अंमलबजावणी**

**(२९) १०९११० (२१-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने मागासवर्गीय उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातुन अर्ज करु नये असे पत्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पाठविले असल्याची गंभीर माहिती माहे डिसेंबर, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात उघडकीस आलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या समांतर आरक्षणासाठी काढलेल्या परिपत्रकाची होणारी चुकीची अंमलबजावणी थांबवावी आणि त्याद्वारे झालेल्या सर्व भरती बेकायदेशीर ठरवून नव्याने परीक्षा घ्याव्यात अशी मागणी स्पर्धा परीक्षेच्या उमेदवारांनी मा.सामाजिक न्याय राज्यमंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी समान आरक्षणाबाबतच्या परिपत्रकाचा चुकीचा अर्थ लावून गुणवत्ता असलेल्या मागासवर्गीय माजी स्वातंत्र सैनिकांची खुल्या स्वतंत्र सैनिक प्रवर्गातून, मागासवर्गीय मुलींची खुल्या महिला प्रवर्गातून, मागासवर्गीय खेळाडूंची खुल्या खेळाडू प्रवर्गातून निवड केली जात नाही हे समानतेचा मूलभूत अधिकार आणि शासकीय नोक-यांमधील समान संधी नाकारणे अशाच प्रकारे होत असल्याने याबाबत शासनाने स्पष्ट निर्देश देण्याची मागणी युवा जनता दल युनायटेडच्या शिष्टमंडळाने मा.सामाजिक न्याय राज्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची नव्याने परीक्षा घेण्याबाबत तसेच सदरील प्रश्नाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१८) :**(१) हे खरे नाही

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यातील अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील कर्मचा-यांना पदोन्नतीत आरक्षण देण्याचा शासनाचा निर्णय रद्दबातल ठरल्याबाबत**

**(३०) १०९३७० (२१-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील कर्मचा-यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याचा शासनाचा निर्णय रद्दबातल ठरल्याने एससी एसटी प्रवर्गातील कर्मचा-यांवर अन्याय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी मागासवर्गीयांना दिलासा देण्यासाठी कोणता निर्णय घेतला व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, मागासवर्गीय कर्मचा-यांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०१८) :** (१), (२), (३) व (४) पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ दाखल केली असून, मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाच्यावतीने प्रभावी बाजू मांडण्यासाठी जेष्ठ विधीज्ञ श्री.हरिश साळवे, श्री.के.के. वेणूगोपाल, ॲटर्नी जनरल ऑफ इंडिया व श्रीराम पिंगळे ॲडव्होकेट ऑन रेकॉर्ड, एस.के.लिगल असोशिएट व श्री. गुरुमूर्ती कुमार जेष्ठ विधिज्ञ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर याचिकेवर दि.१३.११.२०१७ व १५.११.२०१७ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयात सुनावणीस आली असता राज्य शासनाच्या वतीने युक्तीवाद करताना विशेष समुपदेशींनी मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्या दि.४/८/२०१७ च्या निर्णयास स्थगिती देण्याची विनंती मा.सर्वोच्च न्यायालयास केली होती.तथापि,त्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने कोणतेही आदेश न देता सदर प्रकरण घटनापीठाची रचना करण्यासाठी मा.सरन्यायाधिश ,सर्वोच्च न्यायालय यांच्यापुढे ठेवावे,असे आदेश दिले आहेत. त्यामुळे प्रशासकीय कामकाज सुरळीत चालण्याच्या दृष्टीने पदोन्नती प्रक्रिया पुर्णपणे स्थगित न करता, सद्यस्थितीत पदोन्नतीच्या कोट्यातील मागासवर्गीयांची आरक्षित पदे रिक्त ठेऊन खुल्या प्रवर्गातील पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या

निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत,याबाबत विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने राज्य शासनाने दि. २९.१२.२०१७ रोजी आदेश निर्गमित केले आहेत. सदर पदोन्नत्या देताना जेष्ठतेनुसार पात्र असणा-या खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील तसेच ज्यांना दि. २५.५.२००४ च्या आदेशानुसार पदोन्नतीचा लाभ मिळालेला नाही, अशा जेष्ठतेनुसार पात्र ठरणाऱ्या मागासवर्गीय अधिकारी/कर्मचा-यांना देखिल पदोन्नत्या देण्यात येत आहेत.
सद्यस्थितीत प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथील "श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती"**
**कर्मचा-यांना आकृतीबंध लागू करणेबाबत**

**(३१) १०९५६५ (०७-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर, (जि.सोलापूर) येथील "श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती" यांना विधी व न्याय विभाग यांनी दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासन निर्णय काढून मंदिर समिती कर्मचारी यांना वेतन व इतर सोयीसुविधा,कर्मचारी आकृतीबंध तातडीने लागू करणेबाबत सदर मंदिर समिती प्रशासन यांना आदेश दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मंदिर समिती हि राज्य शासनाच्या अधिकारात येत असल्यामुळे या मंदिर समितीतील कर्मचारी यांना आकृतीबंध तातडीने लागू करावा असा आदेश मा.उच्च न्यायालय यांनी सुध्दा राज्य शासनाला, मंदिर समिती यांना दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंदिर समिती कर्मचारी यांनी आकृतीबंध तातडीने लागू करणेबाबत मा.मुख्यमंत्री व इतर संबंधित मंत्री यांना वारंवार विनंती पत्रे, देऊनही अद्याप मंदिर समिती पंढरपूर यांच्याकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मंदिर समिती कर्मचारी यांना आकृतीबंध लागू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१८) :** (१) होय.
विधि व न्याय विभाग शासन निर्णय दि.२९.११.२०१६ अन्वये श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांच्या आस्थापनेवरील २२७ पदांचा आकृतीबंध मंजुर करण्यात आला आहे.
(२) नाही. हे खरे नाही.
मा.उच्च न्यायालय येथे दाखल रिट याचिका क्र.११२०६/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने मंदिर समितीने सेवा विनियम तयार करुन धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी दि.०८.०९.२०१७ रोजी सदर सेवा विनियमास मान्यता दिली आहे.

(३) नाही. हे खरे नाही.
(४) विधि व न्याय विभाग, शासन निर्णय दि.२९.११.२०१६ रोजीच्या आकृतीबंधानुसार पात्र कर्मचाऱ्यांना नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबइतील बँक खात्यातून, चोरट्यांनी बनावट क्रेडिट कार्डद्‌वारे व एटीएम केंद्रातून पैसे काढून लाखो रुपयांची फसवूणक केल्याबाबत**

**(३२) १०९६५३ (१८-०४-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतीय शास्त्रज्ञ डॉ. राहुल गजभिये यांच्या बँक खात्यातून, चोरट्यांनी बनावट क्रेडिट कार्डद्‌वारे लाखो रुपयांची ऑनलाईन खरेदी करुन फसवूणक केल्याप्रकरणी, भोईवाडा पोलीस ठाण्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास गुन्हा नोंदवूनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच, कांदिवली (पूर्व) ठाकूर कॉम्पलेक्स मध्ये एटीएम केंद्रातून, किमया बनसोडे या महिलेच्या बँक खात्यातून, परस्पर रुपये ८० हजार काढून अपहार केल्याप्रकरणी दिनांक १८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास समतानगर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यात आली असुन याबाबत पोलीसांकडून कोणतीच कारवाई करण्यात आली नाही , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार आरोपीस अटक व त्यांचे विरुध्द कारवाई करुन, चोरी केलेले पैसे हस्तगत करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, मुंबईत एटीएम कार्डद्‌वारे, बँक खात्यातून परस्पर पैसे चोरी करण्याच्या घटनामध्ये सातत्याने वाढत होत असल्याने, या वाढत्या घटना रोखण्यासाठी, शासनातर्फे उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
सदर प्रकरणी भोईवाडा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. २५२/२०१७ भा.दं.वि. कलम ४२० सह कलम ६६(क)(ड) माहिती व तंत्रज्ञान कायदा २००० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने झालेल्या व्यवहाराची माहिती मिळण्यासाठी संबंधित बँकेस फौ.दं.प्र.सं. कलम ९१ प्रमाणे नोटिस देण्यात आली असुन गुन्हा तपासावर आहे.
(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी समतानगर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ५४८/२०१७ भा.दं.वि. कलम ४२० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने फिर्यादी यांनी व्यवहार केलेल्या एटीएम केंद्रातील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करण्यात आले असुन त्याद्वारे आरोपीचा शोध व तपास सुरु आहे.

(३) व (४) अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी व गुन्ह्यांच्या तपासाकरीता पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

अ) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे आस्थापनेवर सायबर क्राईम विंग करीता माहिती व तंत्रज्ञान केंद्र असलेले चार नवीन सेल निर्माण करुन त्यासाठी विविध संवर्गातील १८६ पदांना मंजुरी देण्यात आली आहे.

ब) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी सायबर गुन्ह्यांचा तपास व प्रतिबंध करणे तसेच, शिक्षेचे प्रमाण वाढण्याकरिता बृहन्मुंबईतील सर्व पोलीस ठाणेत दि. ०९.१२.२०१७ पासुन 'सायबर गुन्हे तपास व प्रतिबंध कक्ष' स्थापन करुन त्यातील अधिकारी व अंमलदार यांना सायबर गुन्ह्याच्या तपासाबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे.

क) मुंबईतील पोलीसांना सायबर गुन्ह्याच्या तपासाबाबत नियमित प्रशिक्षण देण्यात येत आहे.

ड) सामान्य जनतेस सायबर गुन्ह्याबाबत विविध माध्यमांव्दारे जनजागृती करण्यात येत आहे.

इ) शाळा, कॉलेजमधील विद्यार्थ्यांना व विविध आस्थापनांना सायबर गुन्ह्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगांव (जि.वाशीम) येथे स्वस्त धान्य दुकानदार व नागरिक या दोन गटांत दगडफेक व तोडफोड झाल्याबाबत

**(३३) १०९९६० (१२-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.वाशीम) येथे स्वस्त धान्य दुकानदार व नागरिक यांच्यात आधारकार्ड जोडणीच्या कारणावरून दोन गटांत माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दगडफेक व तोडफोड झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दगडफेक व तोडफोडीत वाहनांचे व रास्त धान्य दुकानाचे नुकसान झाले आणि सदर दुकानदार व त्यांच्या कुटुंबियांना मारहाण झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणातील दोषींवर पोलीसांनी कारवाई करावी अशी मागणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार संबंधीत दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच सदर नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. सदरची घटना दिनांक ११.०१.२०१८ रोजी घडलेली आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन मालेगांव, जि.वाशिम येथे खालीलप्रमाणे ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत :-

(१) अप क्र.०७/२०१८ कलम ३०७,३२४,३२३, ४५२, १४३,१४७,१४८,१४९,४२७,५०४,५०६ भा.दं.वि. सदर गुन्ह्यामध्ये ९ आरोपी असून ७ आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरित २ आरोपींचा शोध सुरु आहे. अटक आरोपी जामिनावर मुक्त आहेत.

(२) अप क्र.०८/२०१८ कलम ३२४,३२३,३४ भा.दं.वि. सदर गुन्ह्यामध्ये एकूण ३ आरोपी असून सदर गुन्ह्याचा पोलीस तपास सुरु आहे.

(३) अप क्र.०९/२०१८ कलम ३५३,३३३,१८६,३३६, १४३,१४७,१४८,१४९,४२७ भा.दं.वि. सहकलम ७ क्रिमीनल लॉ ॲमेंडमेंट ॲक्ट सन १९३२. सदर गुन्ह्यामध्ये २१ आरोपी असून ८ आरोपींना अटक करण्यात आली असून १३ आरोपींचा शोध सुरु आहे. अटक आरोपीं सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण पूर्व-पश्चिम रेल्वे स्थानक भागातील रेल्वेच्या हद्दीतील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३४) ११०१५७ (१२-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण पूर्व-पश्चिम रेल्वे स्थानक भागातील रेल्वेच्या हद्दीतील रस्त्यांची अत्यंत दूरवस्था झाल्याबाबत स्थानिक रिक्षा चालकांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारासच्या सुमारास रेल्वे अभियंता कार्यालयावर मोर्चा काढला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनामार्फत रेल्वे मंत्रालयाकडे काही पाठपुरावा केला आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१८) :** (१) होय, हे अशंतः खरे आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ-३ मधील कोळसेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत रिक्षा संघटनेच्या वतीने नियोजित दिनांकास मोर्चाचे आयोजन केले होते. परंतू रेल्वेचे इंजिनियर यांनी त्यांचे कार्यालयात सदर रिक्षा संघटनेचे पदाधिकारी, रिक्षाचालक यांची बैठक घेऊन त्यांना रेल्वे स्थानक भागातील रेल्वेच्या हद्दीतील रस्त्यांचे काम करुन देण्याचे आश्वासन दिल्याने सदरचा मोर्चा हा रद्द करण्यात आला. त्यानुसार रेल्वेने ८ ते १० दिवसांत सदरचे काम पूर्ण करुन दिल्याने सदरचा मोर्चा काढण्यात आला नाही.

(२) सदर प्रकरणी रस्त्यांची तातडीने दुरुस्ती व डांबरीकरण झाल्याने प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील जुईनगर येथील बँक ऑफ बडोदा येथे भुयार खोदुन दरोडा टाकण्यात आल्याबाबत

**(३५) ११०७१९ (१२-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील जुईनगर येथील बँक ऑफ बडोदा येथे भुयार खोदुन दरोडा टाकण्यात आला असल्याचे दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे ३० लॉकर तोडून २० ग्राहकांचा सुमारे २ कोटी रुपयांचा ऐवज लुटून नेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या गुन्हयाचा शोध घेऊन त्यातील आरोपींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) बँकेचे ३० लॉकर तोडून ३० ग्राहकांचा एकूण रु.३,४०,२६,८७३/- किंमतीचा ऐवज घरफोडी चोरी गेला आहे.
(३) सानपाडा पो.स्टे., गु.र.नं.१३६/१७, भादंवि ४५४, ४५७, ३८०, ४०१, ४११, ४१४, ४७३,४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), ३०८ ३४ सह महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(१) (दोन), ३(२), ३(४) अन्वये दिनांक १३/११/२०१७ रोजी गुन्हा दाखल आहे.
नमूद गुन्हयातील ११ आरोपीतांचा राज्य व परराज्यातून शोध घेवून अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीतांविरुध्द सबळ पुरावे गोळा करुन, मा.विशेष मोक्का न्यायालय, ठाणे येथे दोषारोपपत्र दि.९/४/२०१८ रोजी सादर करण्यात आले आहे. रु.२,४०,०१,४०९/- इतक्या रक्कमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## हिंगोली शहरात मोठ्या प्रमाणावर अवैध मांस विक्री होत असल्याबाबत

**(३६) ११२५८७ (१२-०४-२०१८). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहराच्या मोक्याच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अवैध मांस विक्री होत असून मांस विक्रेत्याकडे कोणत्याही प्रकारची मांस विक्री परवाना नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अवैध मांस विक्री सबंधीत अधिकारी व पोलीस प्रशासनाच्या संगनमताने होत असल्याचे तेथील महिलांनी व नागरिकांनी उघडकिस आणले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) सदरची घटना खरी नसल्याने चौकशी करण्यात आलेली नाही. तथापी, अवैध मांस विक्री बाबत हिंगोली जिल्ह्यातील सर्व ठाणे प्रभारी अधिकारी यांना पोलीस अधिक्षक,हिंगोली यांनी शहरात अवैध मांस विक्री होणार नाही याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत .
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात न्यायाधीशांच्या व कौटुंबिक न्यायालयाच्या संख्येत वाढ करण्याबाबत

**(३७) ११२८०२ (१७-०४-२०१८). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सद्यस्थितीत २२ कौटुंबिक न्यायालयांमध्ये सुमारे ३४ हजार प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे प्रकरणांचा लवकरात लवकर निपटारा होण्यासाठी कौटुंबिक न्यायालयाच्या संख्येत वाढ करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास कौटुंबिक न्यायालयात सध्या दररोज १५ ते १६ दावे दाखल होत असून न्यायालयात वाढत्या दाव्यांची संख्या लक्षात घेऊन न्यायालये व न्यायाधीशांची संख्या वाढविणे आवश्यक असल्याने याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१८) :** (१) होय, १४ व्या वित्त आयोगांतर्गत राज्यात १४ ठिकाणी कौटुंबिक न्यायालये स्थापनेचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) दि.२९/११/२०१६ च्या अधिसूचनेनुसार १) सांगली, २) रायगड-अलिबाग, ३) जळगाव, ४) परभणी, ५) यवतमाळ, ६) अहमदनगर, ७) सातारा, ८) जालना, ९) धुळे, १०) बुलढाणा, ११) लातूर, १२) बीड, १३) भंडारा, आणि १४) उस्मानाबाद या १४ जिल्ह्यांच्या ठिकाणी कौटुंबिक न्यायालय स्थापन्यास मंजूरी देण्यात आली आहे. त्यापैकी लातूर, उस्मानाबाद, बुलढाणा आणि अहमदनगर या चार ठिकाणी कौटुंबिक न्यायालये कार्यरत झाली आहेत. उर्वरित ठिकाणी कार्यरत करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पोलीस दलाकरिता शासनाने खरेदी केलेल्या बुलेट प्रुफ जॅकेटच्या दर्जाबाबत**

**(३८) ११२८२७ (०७-०४-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या पोलीस दलाकरिता दिनांक १९ ऑगस्ट,२०१७ च्या सुधारित पुरवठा आदेशान्वये एकूण ४६१४ बुलेट प्रुफ जॅकेट प्राप्त झालेली असून त्यातील काही नमुने बॅलेस्टीक चाचणीसाठी सेन्ट्रल फॉरेन्सिक सायन्स लॅब, चंडीगड येथे पाठविण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बुलेट प्रुफ जॅकेटचा बॅलेस्टीक चाचणी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अहवालाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१८) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) केंद्रीय न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, चंदीगड येथे घेण्यात आलेल्या चाचणी मध्ये ९ लॉटपैकी लॉट क्र.२, ६ व ९ मधील बुलेट प्रतिरोधक जॅकेट्समधील नमुने MP-५, SLR ७.६२ mm, Insas ५.५६mm,च्या Fire मध्ये पात्र आणि AK-४७ च्या Fire मध्ये अपात्र ठरल्याने त्या लॉट मधील एकूण १४३२ नग बुलेट प्रतिरोधक जॅकेट्स पुरवठादार कंपनीस परत करण्यात आले आहेत. त्यामुळे उर्वरित पात्र ठरलेल्या एकूण ३१२२ बुलेट प्रतिरोधक जॅकेट्सचे संबंधित पोलीस घटकास वाटप करण्यात आले आहे. अपात्र ठरवलेले १४३२ बुलेट प्रतिरोधक जॅकेट्सचा पुरवठादाराकडून नव्याने पुरवठा झाल्यानंतर त्याची केंद्रीय न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, चंदीगड येथे बॅलेस्टीक चाचणी करण्यात येईल व तपासणीमध्ये पात्र ठरल्यास सदर बुलेट प्रतिरोधक जॅकेट्सचे वाटप पोलीस दलास करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदुरा तालुक्यातील (जि.बुलढाणा) अवैध धंदे व वाहतूकीमुळे कायदा व सुव्यवस्था गंभीर झाल्याबाबत

**(३९) ११२८९८ (१२-०४-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा तालुक्यातील (जि.बुलढाणा) अवैध धंदे व अपु-या कागदपत्रांच्या चालणा-या वाहतूकीमुळे कायदा व सुव्यवस्था गंभीर झाली असून याबाबतचे लेखी निवेदन दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हा पोलीस अधिक्षकांना देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१८) :** (१) जि.प. सदस्य यांनी सर्व अवैध धंदे व अवैध प्रवासी वाहतूक बंद करण्याबाबतचे निवेदन पोलीस अधीक्षक कार्यालय, बुलढाणा येथे दिलेले आहे.

(२) नांदुरा तालुक्यात अवैध प्रवासी वाहतुक करणारे, मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांविरुध्द तसेच चोरुन लपून अवैध दारु बाळगणारे, विक्री करणारे व जुगार चालविणाऱ्यांविरुध्द वेळीच कारवाई करण्यात येत आहे. जानेवारी-२०१७ ते एप्रिल-२०१८ या कालावधीत ११११६६ मोटार वाहन प्रकरणावर कारवाई करण्यात आली असून सदर प्रकरणात एकूण २०,३७,९००/- इतकी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच दारुबंदीच्या २३२ व जुगाराच्या २०७ प्रकरणावर कारवाई करण्यात आली आहे.

संबंधीत पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना त्यांचे हद्दीत कोणतेही अवैध धंदे चालणार नाहीत याबाबतच्या सूचना पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांच्या कार्यालयाने दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देगलूर (जि.नांदेड) येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत

**(४०) ११२९५४ (१७-०४-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (जि. नांदेड) येथील न्यायालयाची निजामकालीन इमारत पाडून त्याठिकाणी न्यायालयाची नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबतच्या कामास मंजूरी देण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाच्या निजामकालीन इमारत जुनी झाल्याने तेथील अधिकारी, कर्मचारी व नागरिकांच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू न्यायालयाची इमारत बांधण्यास किती रुपयांची तरतूद केली आहे तसेच सदरहू बांधकामास केव्हापासून सुरुवात करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मा.प्रबंधक (निरीक्षणे-२),मा.उच्च न्यायालय, मुंबई, यांचे दिनांक १८ जानेवारी २०१७ च्या पत्रान्वये देगलूर येथे जूनी न्यायालयीन इमारत पाडून त्या जागी नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याकरीता एकूण रु.७०५.०० लक्ष इतक्या अंदाजित किंमतीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही.

नांदेड जिल्ह्यातील न्यायालय इमारती, न्यायाधिश निवासस्थाने व कर्मचारी निवासस्थाने यांच्या बांधकामाबाबत मा.प्रधान न्यायाधिश, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६/१२/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे देगलूर न्यायालय परिसरातील जुन्या इमारती पाडून नविन न्यायालयीन इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.
(३) मा.प्रबंधक (निरीक्षणे-२), मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी देगलूर येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याकरीता एकूण रु.७०५.०० लक्ष इतक्या किंमतीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाची सार्वजनिक बांधकाम विभागाने छाननी करुन अंतिमत: रु.७५८.२३ लक्ष इतकी किंमत निश्चित केली आहे. सदर प्रस्तावास शासनाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर विधानमंडळाच्या त्यापुढील अधिवेशनात सदर रक्कमेची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येऊन संबंधित अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना निधी वितरीत करण्यात येईल. तद्नंतर कार्यारंभ आदेश देण्यात येऊन काम सुरु करण्याची कार्यवाही होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शीव - पनवेल मार्गावरील मानखुर्द (मुंबई) येथे बालसुधारगृहाच्या पदपथावरील दिवे नसल्यामुळे तेथील गर्दुल्ले, माफिया आणि मद्यपी यांचे प्रमाण वाढल्याबाबत

**(४१) ११३००५ (१२-०४-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शीव-पनवेल मार्गावरील मानखुर्द (मुंबई) येथे ७० एकर जागेत असलेल्या बालसुधारगृहाच्या जागेत पदपथ दिवे नसल्याने गर्दुल्ले,मद्यपी आणि माफिया वृत्तीचे लोक असल्याने तेथील स्थानिक रहिवाशी, स्त्रीया, लहान मुले यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणाकडे स्थानिक पोलीस ठाणे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त बाबींची सखोल चौकशी करुन तातडीने पथदिवे कार्यान्वित करण्याबाबत तसेच गर्दुल्ले व माफिया यांच्याकडून बालसुधारगृहातील मुले / मुली यांसह स्थानिक रहिवाशी स्त्रीया, लहान मुले यांना धोका निर्माण होणार नाही याबाबत शासनस्तरावर कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी गर्दुल्ल्यांनी त्रास दिल्याबाबत स्थानिक रहिवाशांकडुन ट्रॉम्बे पोलीस ठाणे येथे कोणतीही तक्रार प्राप्त नाही. मात्र बालगृह कार्यालयाकडुन दि. २२.११.२०१७ रोजी गर्दुल्ल्याकडुन प्रवेशितांना व कर्मचा-यांना धोका होण्याची शक्यता असल्याबाबतचे पत्र ट्रॉम्बे पोलीस ठाणेत प्राप्त आहे. बालगृहाच्या सुरक्षेच्या दृष्टीने ट्रॉम्बे पोलीस ठाणेकडुन पोलीस मोबाईलची नियमित गस्त ठेवण्यात आलेली आहे. पोलीस ठाण्यातील दिवसपाळी व रात्रपाळी गस्तीवर पर्यवेक्षण करण्यात येते. त्याचप्रमाणे रात्रीच्या वेळी वायरलेस मोबाईल सदर भागात नियमित उभी ठेवण्यात येते.

(३) या बालसुधार गृहाच्या निवासी व कार्यालयीन इमारती असलेल्या भागात दिवे असुन ते चालु स्थितीत आहेत. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने दररोज दिवसा व रात्री संस्थेच्या आवारात सातत्याने गणवेशातील तसेच साध्या कपड्यातील पोलीसांची गस्त सुरु असुन कोणतीही अनुचित घटना घडु नये याकरीता निगराणी ठेवली जाते. बालगृहाच्या सुरक्षिततेकरीता 'ल' विभागाकडुन कायमस्वरुपी दिवसा व रात्री ४ अंमलदारांची हत्यारी गार्ड व महिला अंमलदार यांचीही नेमणुक केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## काटेवाडी (ता.बारामती, जि.पुणे) येथील जिल्हा बँकेतील रोखपालाच्या खोट्या आरोपामुळे युवकाने केलेली आत्महत्या

**(४२) ११३३१९ (१२-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटेवाडी (ता.बारामती, जि.पुणे) येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाखेतील रोखपालाने केलेल्या खोट्या आरोपामुळे १७ वर्षीय महेश भानुदास मुगुटराव कोळी या युवकाने आत्महत्या केल्याची गंभीर घटना दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०१८) :** (१) होय. सदरची घटना दि.३१.१.२०१८ रोजी घडलेली आहे.

(२) व (३) सदर घटनेबाबत बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.६२/२०१८ भा.दं.वि. कलम ३०६ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एक आरोपी असून त्यास दि.०३.०२.२०१८ रोजी तात्पुरत्या स्वरुपात अटकपुर्व जामीन मंजूर केलेला आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरात भाडेकरू नोंदणीसाठी सुरु करण्यात आलेल्या पोर्टलबाबत**

**(४३) ११३६६१ (०७-०४-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात सुरक्षिततेची उपाययोजना म्हणून भाडेकरू नोंदणीसाठी सुरु करण्यात आलेल्या पोर्टलवर एका वर्षात केवळ ५० हजार ६१८ भाडेकरूंची नोंदणी झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी पुणे शहरात घडलेल्या बॉम्बस्फोटातील संशयित आरोपी भाडेतत्वावर वास्तव्यास होती, तरीही हा विषय पोलिसांकडून गंभीरपणे घेतला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

पुणे शहरात सुरक्षिततेची उपाययोजना म्हणून भाडेकरू नोंदणीसाठी, पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे परीक्षेत्रामध्ये दिनांक ३० मे, २०१७ पासून punepolice.co.in - Tenant Information हे पोर्टल सुरु करणेत आले असून, त्या पोर्टलवर पोर्टल सुरु झाल्यापासून दि.१२/०४/२०१८ पर्यंत एकूण ७६,३६१ भाडेकरुंचे रिपोर्ट दाखल झालेले आहेत.

(२) सदरचा विषय पुणे पोलीसांकडून गांर्भीयाने हाताळण्यात येतो.

दरमहा सिमकार्ड विक्रेते व धारक यांची पडताळणी व अधिकृत रजिस्टर रखान्यानुसार भरुन घेण्यात येत आहेत. तसेच ज्या घरमालकांनी त्यांचे घर/फ्लॅट मध्ये भाडेकरु ठेवलेले आहेत अशा भाडेकरुंची माहिती पोलीसांना देणेबाबत घर/फ्लॅट मालकांवर बंधनकारक करणेत येवून त्याबाबत वेळो वेळी सीआरपीसी १४४ प्रमाणे नोटीस काढण्यात येतात व त्याची अंमलबजावणी पुणे शहरातील सर्व पोलीस स्टेशनस्तरावर करणेत येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यसेवा पूर्व परीक्षेची जाहिरात प्रसिध्द होण्यापूर्वीच व्हॉट्सॲप या प्रणालीवर पसरल्याबाबत**

**(४४) ११३७२३ (१८-०४-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा पूर्व परीक्षेची जाहिरात प्रसिध्द होण्यापूर्वीच व्हॉटसॲपवर पसरल्याची बाब दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारस निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्पर्धा परीक्षा देणा-यांनी ही जाहिरात प्रसिध्दी माध्यमांकडे पोहोचवली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :** (१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा पूर्व परीक्षा २०१८ करीता संक्षिप्त जाहिरात दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या अंकामध्ये प्रसिध्द करण्यासाठी विविध वृत्तपत्रांना एक दिवस अगोदर म्हणजे दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी पाठविण्यात आली होती. सदर जाहिरात दि. २८ डिसेंबर, २०१७ रोजी सायंकाळी व्हॉटसअपवर व्हायरल झाल्याचे निदर्शनास आले.

(२) व (३) सदर जाहिरात वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्याकरीता आयोगामार्फत विविध वृत्तपत्रांना पाठविण्यात आली होती. आता यापुढे आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणा-या जाहिराती प्रथम आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याचा व त्यानंतरच वृत्तपत्रांमध्ये संक्षिप्त जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी देण्याचा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने निर्णय घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पैठण (जि.औरंगाबाद) येथे ऊसाला हमी भाव मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनावर पोलीसांनी केलेला गोळीबार

**(४५) ११३७४७ (०७-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात पैठण येथे प्रती क्विंटल ऊसाला रुपये ३ हजार १०० हमी भाव द्यावा यासाठी माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शेतक-यांनी आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आंदोलनात पोलीसांनी केलेल्या गोळीबारात २ शेतकरी जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जखमी शेतक-यांना शासनाने घोषणा करुनही प्रशासनाच्या अनावस्थेमुळे अद्याप आर्थिक मदत मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर शेतक-यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१८) :** (१) व (२) होय. सदरचे आंदोलन मौजे खानापूर जवळ, गंगामाई साखर कारखाना, घोटण, ता.शेवगांव, जि.अहमदनगर येथें दिनांक १५.११.२०१७ रोजी झालेले आहे. आंदोलनादरम्यान पोलीसांनी केलेल्या गोळीबारात जमावातील पैठण येथील दोन शेतकरी जखमी झाले आहेत.
(३) व (४) सदर आंदोलनातील २ जखमी शेतकरी यांना तहसिलदार, पैठण, जि.औरंगाबाद यांचेमार्फत प्रत्येकी रुपये १,००,०००/- आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घाटकोपरच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने कफ सिरपच्या बाटल्यांची तस्करी करणा-या दाम्पत्यांना अटक केल्याबाबत**

**(४६) ११३८७८ (१४-०४-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तीन ते चार वर्षापासून कफ सिरपच्या बाटल्यांची तस्करी करणा-या संतोष हलवाई आणि त्याची पत्नी आशा हलवाई यांना लाखो रुपयांच्या साठ्यांसह घाटकोपरच्या अंमली पदार्थ विरोधी पथकानी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) अंशत : खरे आहे. संतोष शिवनाथ हलवाई यांनी Codeine Phosphate and Chlorpheniramine maleate syrup १३८ bottles बेकायदेशीरपणे बाळगल्याचे अढळून आल्याने त्यांच्या विरुध्द कुर्ला पोलीस ठाणे अंतर्गत दि.१३.०१.२०१८ वेळ १९.४५, ठा. दै.क. ३४/१८ अन्वये वि.स्था. क.०२/१८कलम १८ (क), १८(अ) सह २७ औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० वि.स्था.गुन्हा नोंद करुन अटक करण्यात आली आहे.
(२) तपास चालु आहे व सदरचे दोषारोपपत्र सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया ते रायपूर इंटरसिटी एक्सप्रेसने जात असतांना ०३.०८२ किलोग्रम सोना चोरी झाल्याचे प्रकरण**

**(४७) ११४१६२ (१२-०४-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भरत जैन रा.मुंबई हे दिनांक २० ऑक्टोंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास गोंदिया ते रायपूर इंटरसिटी एक्सप्रेसने जात असतांना ०३.०८२ किलोग्रम सोना असलेली बॅग चोरीला गेली असता श्री भरत जैन यांनी गोंदिया रेल्वे पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेल्वे पोलीसांच्या तपासादम्यान सोने असलेली बॅग चोरी करणारे आणि चोरीचा सोने खरेदी करणारे एकून १३ आरोपीं असल्याचे पोलीस चौकशीत सिध्द झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोना असलेली बॅग चोरी करणारे आणि चोरीचा सोना खरेदी करणारे एकूण १३ आरोपींना गोंदिया रेल्वे पोलीसांनी गेल्या दिड वर्षापासून अद्यापही अटक केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्याचा तपशिल काय आहे व तद्नुसार आरोपींवर कारवाई आणि चोरीला गेलेला सोने आरोपींकडून हस्तगत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :** (१) भरत जैन, रा.मुंबई हे दि.२०/१०/२०१६ रोजी गोंदिया ते रायपूर इंटरसिटी एक्सप्रेसने जात असतांना त्यांची २.०७२ किलोग्रॅम सोने असलेली बॅग चोरी गेल्याने त्यांनी केलेल्या फिर्यादीवरुन रेल्वे पोलीस स्टेशन गोंदिया येथे अपराध क्र.१०१/२०१६ कलम ३७९, ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२), (३) व (४) एकूण ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. उर्वरित ५ पाहिजे आरोपी आहेत.

तसेच मुद्देमाल विकत घेणाऱ्या दोन सोनारांपैकी एका सोनारास मा.उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला असून त्याचा अटकपूर्व जामीन रद्द करणेकरीता मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे रिव्हीजन पिटीशन दाखल करण्यात आले आहे. तपास सुरु आहे.
(५) सदर गुन्ह्यातील अटकपूर्व जामीनावर असलेल्या श्रीपाद रविंद्र मंजरतकर यांचे अटकपूर्व जामीन रिव्हीजन पिटीशनव्दारे मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांचेकडून रद्द करुन व या गुन्ह्यातील पाहिजे असलेला आरोपी दत्तप्रसाद मंजरतकर यास अटक करुन त्यांने सोने कोणाला विकले आहे, याचा तपास करुन चोरीचे सोने हस्तगत करणे तसेच उर्वरीत आरोपी अटक करणे इत्यादी करीता तपास सुरु आहे.

---

## नाशिक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयावर विद्यार्थ्यांनी काढलेला मूक मोर्चा

**(४८) ११४४२० (१८-०४-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक या कार्यालयावर दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षेची तयारी करणा-या शेकडो विद्यार्थ्यांनी त्यांच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी मूक मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोर्चा काढणा-या विद्यार्थ्यांच्या कोणकोणत्या मागण्या आहेत,

(३) असल्यास, मोर्चा काढणा-या विद्यार्थ्यांनी केलेल्या मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २००९ ते २०१७ मधील कार्यान्वित असलेल्या डमी रॅकेटची आणि त्या रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या इतर व्यक्तींची चौकशी CBI कडे देणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचे केंद्र नाशिक (विभागीय मुख्यालय) करणे, आयोगाच्या सर्व परीक्षांची हजेरी बायोमेट्रिक पध्दतीने होणे, सरळसेवेतील महसुल, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, समाज कल्याण, महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, व इतर अनुषंगिक विभागातील वर्ग-३ ते वर्ग-१ ची विविध पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे भरण्यात यावीत, तसेच ३०% कपातीची बंदी उठवावी, आयोगाकडून जे प्रश्न चुकतात किंवा रद्द करण्यात येतात, त्याचे आयोगाने संदर्भासहित स्पष्टीकरण द्यावे व परीक्षा केंद्रावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने मोबाईल जॅमर बसवावेत इत्यादी मागण्या करण्यात आलेल्या आहेत.

(३) १) विविध परीक्षा मंडळांमार्फत घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये मूळ व डमी उमेदवार बसल्याच्या तक्रारीबाबत गुन्हे अन्वेषण विभाग, औरंगाबाद यांनी मांडवी, पोलीस स्टेशन, ता. किनवट, जि. नांदेड येथे गु. र. नं. २७/२०१६, भा.दं.वि.कलम १६७, १७१, १९३,१९७, १९८,२०१, २०३, २१३,२१४, २१८, ४२०, ४१९, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), ३४ अन्वये आरोपितांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून मा. न्यायालयात दोषारोप क्र. १७/२०१७ (दि.१८.८.२०१७) व क्र. १७(A)/२०१७ (दि. ६.११.२०१७) दाखल करण्यात आले असून सीआरपीसी क्र. १७३(८) प्रमाणे अधिक तपास करण्यात येत आहे. यास्तव सद्य:स्थितीत तपास सीबीआयकडे देणे योग्य ठरणार नाही.

२) आयोगामार्फत आयोजित परीक्षांपैकी मुख्य परीक्षा या मुख्यत: मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर या प्रमुख शहरांच्या ठिकाणी आयोजित करण्यात येते. तथापि, मुख्य परीक्षेकरीता उमेदवारांची संख्या कमी म्हणजेच २००० पेक्षा कमी असल्यास मुख्य परीक्षा फक्त मुंबई केंदावरच घेण्यात येते. मुख्य परीक्षांचे केंद्र निश्चित करताना विभागीय मुख्यालय हा निकष विचारात न घेता उमेदवारांची संख्या वाहतुकीच्या सुविधा व प्रशासकीय सोय हे निकष विचारात घेतले जातात. नाशिक हे मुंबई व औरंगाबाद या मुख्य परीक्षांच्या केंद्रापासून साधारणपणे ३ ते ४ तासांच्या अंतरावर असून दोन्ही ठिकाणी जाण्याकरीता रेल्वे व महामार्ग या वाहतूकीच्या उत्तम सोयी उपलब्ध आहेत. नाशिक विभागातून मुख्य परीक्षेकरीता पात्र ठरणा-या उमेदवारांचे तुलनात्मकदृष्टया अल्प प्रमाण व वाहतुक सुविधा लक्षात घेता प्रस्तुत मागणी मान्य करता येत नाही.

३) तुलनेने कमी उमेदवार असलेल्या व मुंबई केंद्रावरच घेण्यात येणा-या चाळणी परीक्षेत प्रायोगिक तत्वावर बायोमेट्रिक पध्दत वापरण्याचे योजण्यात आले असून त्यानुषंगाने दि. १२ फेब्रुवारी, २०१८ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर घोषणा प्रसिध्द करण्यात आली आहे.

४) आयोगाच्या कार्यकक्षेतील पदाची भरती आयोगामार्फत करण्यात येते. संबंधित प्रशासकीय विभागाकडून तसा प्रस्ताव प्राप्त झाल्यास आयोगाकडून त्यावर सकारात्मक विचार करण्यात येईल.

५) आयोगाच्या प्रश्नपत्रिकेत जे प्रश्न क्वचित चुकतात किंवा उत्तरे चुकतात या विषयी उमेदवारांकडून विहित कालावधीत हरकती/अभिवेदने मागवून त्यावर तज्ञांची मते घेवून अंतिम निर्णय घेतला जातो.

६) स्मार्टफोन अथवा तत्सम अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक साधनांच्या मदतीने परीक्षेमध्ये होणारे संभाव्य गैरप्रकाराचे प्रयत्न रोखण्याच्या अनुषंगाने काही निवडक महत्वांच्या परीक्षांसाठी परीक्षेच्या उपकेंद्रावर मोबाईल जॅमर बसविण्याबाबतची कार्यवाही प्रायोगिक तत्वावर यापूर्वीच सन २०१६ मध्ये सुरु करण्यात आली असून काही परीक्षांकरीता मोबाईल जॅमरचा वापर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे येथील लोहगांव विमानतळाचे विस्तारीकरण व आधुनिकीकरणाबाबत

**(४९) ११४४३६ (१८-०४-२०१८). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील लोहगांव विमानतळाचे विस्तारीकरण, नागरी सुविधा, धावपट्टी, विमानतळ परिसरात पायाभूत सुविधा निर्माण करणे, तसेच पुरंदर येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळ व लोहगांव विमानतळाचे विस्तारीकरण करणे, धावपट्टीची लांबी वाढविणे इत्यादी प्रलंबित प्रश्नाबाबत चर्चा करण्यासाठी केंद्रीय वाहतूक भूपृष्ठ मंत्री यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या पायाभूत समितीची बैठक दिनांक ३० जानेवारी,२०१८ रोजी वा त्या सुमारास नवी दिल्ली येथे झाली, हे खरे आहे काय,

(२)असल्यास,उपरोक्त बैठकीत वर उल्लेखित मुद्यांपैकी कोणकोणत्या मुद्यांवर चर्चा करण्यात आली व त्यानुसार कोणते निर्णय घेण्यात आले आहेत,

(३)असल्यास, उपरोक्त मुद्यांपैकी कोणती कामे केव्हापासून सुरु करण्यात येणार आहेत व यासर्व प्रकल्पातील कामे पूर्ण करण्यासाठी अंदाजे किती खर्च अपेक्षित आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :** (१) पुणे येथील लोहगांव विमानतळाच्या प्रलंबित प्रश्नाबाबत चर्चा करण्यासाठी मा.श्री.नितीन गडकरी, केंद्रीय वाहतूक भूपृष्ठ मंत्री यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या इन्फ्रास्ट्रक्चर कमिटीची बैठक दिनांक ३० जानेवारी, २०१८

रोजी नवी दिल्ली येथे संपन्न झाली. तथापि, सदर बैठकीत पुरंदर येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळासंदर्भात कुठलीही चर्चा झाली नाही.

(२) (३) व (४) सदर बैठकीत पुणे येथील लोहगांव विमानतळाचे विस्तारीकरण, नागरी सुविधा, धावपट्टीचे विस्तारीकरण, विमानतळ परिसरात पायाभूत सुविधा निर्माण करणे, इ.बाबींवर चर्चा करण्यात आली. तसेच, मोठ्या आकाराच्या विमानांना धावपट्टीवर उतरण्याकरिता धावपट्टीची लांबी १००० मीटरने वाढविण्यासाठी राज्य शासनाकडे जमीन उपलब्ध करुन देण्याची मागणी करणे, धावपट्टीच्या विस्तारीकरणाच्या कामाचा खर्च करण्यास भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाची तयारी ठेवणे, इ. बाबींवर सदर बैठकीत चर्चा करण्यात आली. सदर चर्चेनुसार केंद्र शासनाच्या संरक्षण मंत्रालयास प्रस्ताव सादर करण्यात यावा, असा निर्णय घेण्यात आला आहे.

उपरोक्तप्रमाणे विमानतळ विस्तारीकरणासाठी आवश्यक जमीन भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास हस्तांतरीत करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरामध्ये महिला माफियाचे प्रमाण वाढल्याबाबत

**(५०) ११४६८९ (०७-०४-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई सारख्या मोठ्या शहरामध्ये महिला माफियाचे साम्राज्य मोठ्या प्रमाणात वाढले असून गत ७ वर्षात अशा महिला गुन्हेगारांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे, असे एका पाहणीत नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ७ वर्षात अद्यापपर्यंत २१६१३ महिला माफियांना विविध गुन्ह्यांखाली अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अटक केलेल्या महिला माफियांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील एम.एच.बी. कॉलनी पोलीस स्टेशन हद्दीत महिला नामे शशिकला पांडे हिचा साथीदारांच्या मदतीने जमिनीवर अतिक्रमण करणे, दंगल घडविणे, सरकारी कामात अडथळा करणे व धमकावणे यासारख्या गंभीर गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

उपरोक्त नमुद महिला नामे शशिकला पांडे व तिचे साथीदार यांचेविरुध्द एम.एच.बी. कॉलनी पोलीस स्टेशन व बोरीवली पोलीस स्टेशन येथे एकुण ३३ गंभीर दाखल असुन नमुद

गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. तसेच, बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस ठाण्यात सन २०११ ते मार्च २०१८ या कालावधीत इतर दाखल गुन्ह्यांमध्ये एकुण १९२१४ महिला गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे.

महिला नामे शशिकला पांडे हिचेविरुध्द अनेकवेळा हद्दपार/तडीपारीचे आदेश तसेच, कलम १०७ व ११० फौदंप्रस अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. तसेच, पोलीस ठाणेस इतर गुन्ह्यांमध्ये अटक करण्यात आलेल्या एकुण १९२१४ महिला गुन्हेगारांपैकी ५३३९ महिला गुन्हेगारांविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.